0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचा दि. २०/०६/२०११ रोजीचा अहवाल व त्यासोबत प्राप्त झालेली कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंनल/६-अ/प्र.क्र.४७/२०११/जा.५०६, दिनांक २७/०६/२०११, ०६/०७/२०११, १६/०७/२०११ व २५/०७/२०११.

३) समशेर राज बहादूर सिंग व निजाम लुईस महम्मद खान यांचे दि. ११/०७/२०११ रोजीची स्वतंत्र लेखी निवेदने.

४) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचे दि.०३/०८/२०११ रोजीचे अभिवेदन.

५) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचे दि.०९/०८/२०११ रोजीचे पत्र

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४७/२०११/जा.७२९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ०९/०९/२०११.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

व्हिक्टोरिया डॉक ऑफिसजवळील उघड्या जागेत गोडावून क्र. ३ व ४ च्या समोर मुंबई याठिकाणी मोकळ्या जागेत २०० लिटर क्षमतेचे लोखंडी ड्रम असून त्यामध्ये गैरमार्गाने मिळविलेल्या डिझेलचा साठा केलेला आहे व सदरचे डिझेल ते गैरमार्गाने विकण्याच्या तयारीत आहेत, अशी खास बातमी दिनांक १५/०२/२०११ रोजी गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांना मिळाल्याने तेथील पोलिस पथक उक्त ठिकाणी खबरीमध्ये मिळालेल्या माहितीची शहानिशा करण्याकामी गेले. पोलिस पथकाने पंचासह सदर मोकळ्या जागेत प्रवेश केला असता, सदर ठिकाणी दोन इसम हजर असल्याचे तसेच सदर ठिकाणी २०० लिटर क्षमतेचे लोखंडी ड्रम व त्यामध्ये पेट्रोलजन्य पदार्थ असल्याचे दिसून आले.

सदर दोन्ही इसमास त्यांची नावे व सदर ठिकाणी असणाऱ्या लोखंडी ड्रम व त्यामध्ये भरलेले पेट्रोलजन्य पदार्थाबाबत तसेच त्यामध्ये काय माल आहे, याबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांची नावे निजाम खान लुईस महमद खान व समशेरसिंग रामबहादूर सिंग असे सांगून सदर लोखंडी ड्रममध्ये डिझेल भरलेले असून ते

त्यांच्या मालकीचे असून सदर माल साठविण्याचा व वाहतूक करण्याच्या त्यांचेकडे कोणताही परवाना नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सदरचे डिझेल त्यांनी समुद्रमार्गाने तस्करी करुण आणले असल्याचेही सांगीतले.

अशाप्रकारे नमूद आरोपीतांनी समुद्रामार्गे तस्करी करुन अवैधमार्गाने व बेकायदेशीरित्या आणलेल्या डिझेलमध्ये भेसळ करुन सदर पेट्रोलजन्य पदार्थ हा ज्वलनशिल असल्याचे ज्ञात असताना सुध्दा स्वत:जवळ विनापरवाना बाळगला व मानवी जिवन धोक्यात येईल असे ज्वालाग्राही पदार्थ जाणीवपूर्वक जवळ बाळगल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) भा. दं. वि. चे कलम ४२०, २८४, २८५ (२) दि मोटार स्पिरीट ॲण्ड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रीब्युशन ॲण्ड प्रीव्हेंशन ऑफ मालप्रॅक्टीसेस) ऑर्डर २००५ चे कलम ३ (३) दि महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट व स्लोप (ॲक्विझीशन, सेल ॲन्ड स्टोरेज लायेसन्ससिंग ऑर्टर १९६६ चे कलम ३ (४) दि प्रिव्हेन्शन ऑफ ब्लॅक मार्केटिग ॲण्ड मेन्टेनन्स ऑफ इशेन्सीयन कमोडीटीज ॲक्ट १९८० चे कलम ३ (५) दि पेट्रोलियम प्रॉडेक्ट (मेनटेन ऑफ प्रॉडक्शन स्टोरेज ॲन्ड सप्लायर्स) ऑर्डर १९९९ चे कलम ३, ४, ५, ६, ७ तसेच (६) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द गु.शा.नि., मुंबई गु.र.क्र. ०६/११ (यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ०९/२०११ दि.१५/०२/२०११) अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचांसमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २०० लि. क्षमतेचे ४६ लोखंडी ड्रम व त्यामधील डिझेल साठा | ९२०० लिटर | - |
| २ | २०० लि. क्षमतेचे २१ लोखंडी ड्रम व त्यामधील डिझेल साठा | ४२०० लिटर | - |
| | | एकूण | ५,३६,००० |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांनी वाचावे क्र.१ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०४/०७/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०४/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी म्हणून पुढील सुनावणी दि.११/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ११/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस समशेर राज बहादूर सिंग व निजाम लुईस महम्मद खान हे उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ३ मध्ये नमूद लेखी निवेदन सादर केले. तथापी, सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहीले नाहीत. सबब, त्यांना त्याचे म्हणणे सादर करण्याकरीता पुढील संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक २२/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २२/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहीले नाहीत. सबब, त्यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता अंतीम संधी म्हणून पुढील सुनावणी दि. ३/८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०३/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक, श्री. के. आर. सावंत उपस्थित राहीले व त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे वाचावे क्र. ४ अन्वये अभिवेदन सादर केले.

प्रस्तुत प्रकरणी जप्त केलेला द्रव पदार्थ कोणत्या प्रकारचा आहे ? तसेच त्यात भेसळ होती किंवा कसे ? याकरीता रासायनिक पृथ:करण अहवालाची अत्यंत आवश्यकता असल्याने सदरचा पृथ:करण अहवाल प्राप्त होईपर्यंत प्रकरण अंतिम निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

तद्नंतर जप्त केलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यांचा रासायनिक पृथ:करण अहवाल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांनी त्यांचे वाचावे क्र.५ अन्वये या कार्यालयास सादर केला.

सबब, प्रकरण निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

दिनांक ११/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित समशेर राज बहादूर सिंग यांनी युक्तिवाद केला की, त्याचेकडे मुंबई पोर्ट येथे आलेल्या वेगवेगळ्या वेसलकडून स्लॅज/वेस्ट ऑईल घेण्याकरीता त्यांनी सी.पी.सी.बी., न्यु दिल्ली आणि एम.पी.सी.बी., मुंबई येथे अधिकृत नोंदणी केलेली आहे. त्याप्रमाणे त्याचेकडे १) ऑईल युनिट ऑफ न्यु कस्टम हाऊस, मुंबई यांचेकडील दिनांक ३१/०५/२०१६ पर्यंत २) डेप्यूटी कन्सरवेटर ऑफ मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचेकडील दि.३१/०३/२०१२ पर्यंत व ३) मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचेकडील दि.१०/०६/२०१२ पर्यंत विधीग्राहय असल्याबाबतची नोंदणी केलेली आहे. त्याचेकडे स्लॅज/वेस्ट ऑईल पोर्ट ट्रस्टवरुन त्यांच्या रिफायनरी येथे वाहतूक करण्यासाठीचा अधिकृत प्राधिकरणाने दिलेला परवाना आहे. दिनांक २५/०१/२०११ रोजी त्याला वेसल एम.व्ही. समुद्रीका ०४ चे चिफ इंजिनियर यांचेकडून ३.५ मे.ट. (२६ ड्रम्स) स्लॅज/वेस्ट ऑईल नेण्याकरीता पत्र मिळाले होते. त्या अनुषंगाने त्याने कस्टम विभागाकडून वरील ड्रम्स घेण्याबाबत परवानगी घेतली होती. त्याप्रमाणे त्याला फक्त २२ ड्रम्स मिळाले. त्याने सदर ड्रम्सची ३/४ व्ही. डी. ओपन अेरिया येथे साठवणूक केली होती. त्याने त्याठिकाणी हे ड्रम्स काही फॉरमॅलिटी पूर्ण करण्यासाठी जसे एमबी पीटी चे पेमेंट बाकी असल्यामुळे ठेवले होते. जप्त केलेले

ऑईल हे युस्ड, वेस्ट ऑईल/डिझेल ऑईल नसून ते फक्त ल्युब्रिकेंटिग ऑईल गाळण्याकरिता असलेले शेवटचे उत्पादन आहे. त्यासाठी आवश्यक असलेले १) वेसलवरील चिफ इंजीनिअरींग यांचे पत्र २) कस्टम विभागाची परवानगी ३) एमबी. पी.टी. उप प्रबंधक परवानगी ४) पोर्ट ट्रस्ट यांची नोंदणी केलेली पावती ५) एम.पी.सी.बी. येथे नोंदणी असलेली प्रत ६) सी.पी.सी.बी. न्यु दिल्ली येथे नोंदणी असलेली प्रत ७) कस्टुम विभागाची नोंदणी असलेली प्रत व ८) डेप्युटी कन्सरवेटर एमबी. पी.टी. यांना दिलेली परवान्याची फी इ. कागदपत्रे सादर केले असल्याचे नमुद करुन सदरचे ऑईल त्याला परत करावे अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ११/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित निजाम लुईस महम्मद खान यांनी युक्तिवाद केला की, त्याचेकडे मुंबई पोर्ट येथे आलेल्या वेगवेगळ्या वेसलकडून स्लॅज/वेस्ट ऑईल घेण्याकरीता त्यांनी सी.पी.सी.बी., न्यु दिल्ली आणि एम.पी.सी.बी., मुंबई येथे अधिकृत नोंदणी केलेली आहे. त्याचप्रमाणे त्याचेकडे १) ऑईल युनिट ऑफ न्यु कस्टुम हाऊस, मुंबई यांचेकडील दिनांक ३१/१२/२०११ पर्यंत २) डेप्युटी कन्सरवेटर ऑफ मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचेकडील दि.३१/०३/२०१२ पर्यंत व ३) मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचेकडील दि.०४/०९/२०११ पर्यंत पर्यंत विधीग्राहय असल्याबाबतची नोंदणी केलेली आहे. त्याचेकडे स्लॅज/वेस्ट ऑईल पोर्ट ट्रस्टवरुन त्यांच्या रिफायनरी येथे वाहतूक करण्यासाठीचा अधिकृत प्राधिकरणाने दिलेला परवाना आहे. दिनांक ०९/०२/२०११ रोजी त्याला वेसल एम.व्ही. ग्रेटसिप अदिती यांचे चिफ इंजिनियर यांचेकडून १६ मे.ट. (७५ ड्रम्स) स्लॅज/वेस्ट ऑईल नेण्याकरीता पत्र मिळाले होते. त्या अनुषंगाने त्याने लगेचच कस्टम उपायुक्त (ऑईल युनिट) यांची आणि प्रदुषन नियंत्रण मंडळ आणि उप प्रबंधक एम.बी.पी.टी. यांची परवानगी घेतली होती. त्यानुसार ७५ ड्रम्सची परवानगी असतांना फक्त ४५ ड्रम्स त्याला मिळाले. त्याप्रमाणे त्यांनी सदरचे ड्रम्स जेटीवरील ट्रक मध्ये भरले व ते ३/४ व्ही.डी. येथे नेण्याची शेड मॅनेजरची परवानगी घेतली होती. त्यानुसार सदरचे ऑईलने भरलेले ड्रम्स ३/४ व्ही.डी. येथे ओपन एरियामध्ये साठवणूक केले होते. तसे शेड मॅनेजर ३/४ व्ही.डी. येथे पेपर्स जमा केले होते. त्याने त्याठिकाणी हे ड्रम्स काही फॉरमॅलिटी पूर्ण करण्यासाठी जसे एमबी पीटी चे पेमेंट बाकी असल्यामुळे ठेवले होते. जप्त केलेले ऑईल हे युस्ड, वेस्ट ऑईल/डिझेल नसून ते फक्त ल्युब्रिकेंटिग ऑईल गाळण्याकरिता असलेले शेवटचे उत्पादन आहे. त्यासाठी आवश्यक असलेले १) वेसलवरील चिफ इंजीनिअरींग यांचे पत्र २) एजंट/ओनर यांचे पत्र ३) डिसी ऑईल युनिटची परवानगी ४) व्यवस्थापक, प्रदुषन नियंत्रक मंडळ यांची परवानगी ५) उप प्रबंधक, एम.बी.पी.टी. ची परवानगी ६) पेमेंट ऑफ बर्थींगची रक्कम मिळाल्याची पावती ७) पोर्ट ट्रस्टची पावती ८) एम.पी.सी.बी. येथे नोंदणी असलेली प्रत ९) सी.पी.सी.बी. न्यु दिल्ली येथे नोंदणी असलेली प्रत १०) कस्टमची परवानगी ११) डेप्युटी कन्सरवेटर एमबी. पी.टी. यांना दिलेली परवान्याची फी इ. कागदपत्रे सादर केले असल्याचे नमुद करुन सदरचे वेस्ट ऑईल त्याला परत करावे अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०३/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक श्री. के. आर. सावंत यांनी सादर केलेल्या वरिष्ठ पालिस निरिक्षक, गुन्हे शाखा यांचे लेखी अभिवेदनात, प्रस्तुत गुन्ह्यातील माल आरोपीतांना परत करण्यास पोलिसांची सक्त हरकत असून, सदर जप्त माल मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेवर पडून असून गळती होत आहे. तरी सदर जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे आदेश होण्यास विनंती आहे, असे नमूद केले आहे. तसेच वरिष्ठ पालिस निरिक्षक, गुन्हे शाखा यांनी दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या पत्रात, सदरचा जप्त मुद्देमाल डिझेल हा पदार्थ हायड्रो कार्बन ऑईल मिश्रीत असल्याचे नमूद करुन जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे आदेश होण्यास विनंती आहे, असे नमूद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक १५/०२/२०११ रोजी गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार तेथील पोलिस पथक व्हिक्टोरिया डॉक ऑफिसजवळील उघड्या जागेत गोडावून क्र. ३ व ४ च्या समोर मुंबई याठिकाणी पंचासह प्रवेश केला असता, सदर ठिकाणी दोन इसम हजर असल्याचे तसेच सदर ठिकाणी २०० लिटर क्षमतेचे लोखंडी ड्रम व त्यामध्ये पेट्रोलजन्य पदार्थ असल्याचे दिसून आले. सदर ठिकाणी असणाऱ्या लोखंडी ड्रम व त्यामध्ये भरलेले पेट्रोलजन्य पदार्थाबाबत तसेच त्यामध्ये काय माल आहे, याबाबत तेथे उपस्थित निजाम खान लुईस महमद खान व समशेरसिंग रामबहादूर सिंग या इसमांकडे विचारणा केली असता, सदर लोखंडी ड्रममध्ये डिझेल भरलेले असून ते त्यांच्या मालकीचे आहे व सदर माल साठविण्याचा व वाहतूक करण्याच्या त्यांचेकडे कोणताही परवाना नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सदरचे डिझेल त्यांनी समुद्रमार्गाने तस्करी करुण आणले असल्याचेही सांगीतले. यावरुन तेथील एकूण १३४०० लिटर डिझेल द्रव पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला.

सुनावणीचे वेळी आरोपी निजाम लुईस महम्मद खान व समशेर राज बहादूर सिंग यांनी केलेल्या खुलाशात, त्यांना वेसल एम.व्ही. ग्रेटसिप अदिती यांचे चिफ इंजिनियर यांचेकडून स्लॅज/वेस्ट ऑईल नेण्याकरीता पत्र मिळाले होते. त्या अनुषंगाने त्यांनी कस्टम उपायुक्त (ऑईल युनिट) यांची आणि प्रदुषन नियंत्रण मंडळ आणि उप प्रबंधक एम.बी.पी.टी. यांची परवानगी घेतली होती. त्याप्रमाणे त्यांना ऑईलने भरलेले ड्रम्स मिळाले. त्यांनी सदर ड्रम्सची ३/४ व्ही. डी. ओपन अेरिया येथे साठवणूक केली होती. त्याठिकाणी हे ड्रम्स काही प्रक्रीया पूर्ण

करण्यासाठी जसे एमबी पीटी चे पेमेंट बाकी असल्यामुळे ठेवले असल्याचे नमुद केले असून, त्यांनी सादर केलेले कागदपत्र पहाता, सदरचे जप्त द्रवपदार्थ मे.साईओम पेट्रो स्पेशालिटीज लि. वाडा व मेहेर पेट्रो. केमीकल्स प्रा.लि., वाडा येथे नेण्याकरीता ठेवले असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या द्रवपदार्थाचे नमुने न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कालिना यांचेकडे रासायनिक पृथ:करणासाठी पोलीसांनी पाठविले असता, त्यांचेकडून प्राप्त झालेल्या रासायनिक पृथ:करण अहवालात, Exhibit nos. 1 and 2 contains diesel mixed with petroleum hydrocarbon oil असे नमुद केले आहे. म्हणजेच सदर गुन्ह्यात जप्त केलेल्या द्रवपदार्थ पेट्रोलियम हायड्रोकार्बन ऑईल मिश्रीत डिझेल असल्याचे स्पष्ट होते.

आरोपी निजाम लुईस महम्मद खान व समशेर राज बहाद्दूर सिंग यांनी प्रस्तुत प्रकरणी जप्त केलेला द्रवपदार्थाबाबत पोर्ट ट्रस्ट, महाराष्ट्र प्रदुषन नियंत्रण मंडळ तसेच इतर प्राधिकरणाकडील आवश्यक ती कागदपत्रे सादर केली असली तरी, जप्त केलेल्या द्रवपदार्थ पेट्रोलियम हायड्रोकार्बन ऑईल मिश्रीत डिझेल असल्याचा रासायनिक पृथ:करण अहवाल न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेला आहे. तसेच सदरचे जप्त डिझेल त्यांनी समुद्रमार्गाने तस्करी करुण आणले आहे, असे आरोपी यांनी सांगीतले असल्याचे पंचनाम्यात नमुद केले आहे. यावरुन आरोपी यांनी जाणीवपूर्वक व स्वत:च्या फायद्यासाठी सदरचे जप्त डिझेल अवैधमार्गाने प्राप्त करुन त्यामध्ये बेकायदेशिररित्या दुसरा द्रवपदार्थ मिसळून त्याची वाहतूक, विक्री व साठवणूक केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल असून, याबाबत मा.न्यायालयात योग्य ती सत्यसत्यता तपासली जाईलच. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण पेट्रोलियम हायड्रोकार्बन ऑईल मिश्रीत डिझेलचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये गु.शा.नि., मुंबई गु.र.क्र. ०६/११ (यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ०९/२०११ दि.१५/०२/२०११) मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून पुढील आदेश देत आहे.

CONTROLLER OF RATIONING & D... HEAD OF... MUMBAI

0007

आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण एकूण १३४०० लिटर हायड्रोकार्बन ऑईल मिश्रित डिझेलचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेले २०० लिटर क्षमतेचे ६७ लोखंडी ड्रम्सची पोलीसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) निजाम खान लुईस महमद खान
२) समशेरसिंग रामबहादूर सिंग
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.